महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

# क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सवलती देण्याबाबतचे नियम

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
१९८५
[ किंमत—१ रुपया १० पैसे ]

# क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सवलती देण्याबाबतचे नियम

## अनुक्रमणिका


| नियम | नाव | पृष्ठ संख्या |
| --- | --- | --- |
| १ | क्षयरोगविषयक तपासणी .. .. .. .. | १ |
| २ | रोगाची खात्री व रजा मंजूर करणे .. .. .. | १ |
| ३ | रजेच्या कालातील शासकीय अथवा खाजगी वैद्यकीय संस्थांमधील उपचार व आहार भत्ता. | ४ |
| ४ | दरमहा रु. ७६० पेक्षा जास्त वेतन नसलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना खाजगी आरोग्य-धामांमध्ये दाखल केले असता आहार व विशेष औषधे. | ६ |
| ५ | क्षयरोगग्रस्त शासकीय कर्मचारी कामावर परत रूजू होण्यापूर्वी शारीरिक पात्रतेसंबंधी वैद्यकीय तपासणी. | ३ |
| ६ | वैद्यकीय तपासणीसाठी प्रवासभत्ता .. .. .. | ८ |
| ७ | क्षयरोगग्रस्त शासकीय कर्मचारी कामावर परत रूजू झाल्यावर देण्यात येणाऱ्या सवलती | ८ |
| ८ | द्रव्यविषयक सवलती व सरासरी वेतनावरील क्षयरोग रजेच्या सवलती व इतर सवलती | ८ |
| ९ | द्रव्यविषयक सवलतीमुळे येणाऱ्या खर्चासाठी अर्थशीर्ष .. .. | ८ |
| १० | सेवानिवृत्तीनंतर सवलत समाप्ती .. .. .. | ८ |
| ११ | क्षयरोगग्रस्त शासकीय कर्मचारी पुन्हा कामावर रूजू झाल्यावर द्रव्यविषयक सवलती | ८ |
| १२ | सवलती मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी .. .. .. | ९ |
| १३ | कामावर रुजू झाल्यावर कालांतराने करून घ्यायची वैद्यकीय तपासणी .. | ९ |
| १४ | पुन्हा क्षयरोग झाला असता मिळणाऱ्या सवलती, अशा सवलती मंजूर करणारा सक्षम अधिकारी, कर्करोग, पक्षाघात व कुष्ठरोगग्रस्त शासकीय कर्मचाऱ्यांना सवलती, सेवामुक्त करून पुन्हा सेवेत घेण्यात येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारा लाभ. | ९ |
| १५ | कुटुंब मर्यादेची अट .. .. .. .. | १२ |
| १६ | कुटुंबनियोजनविषयक शस्त्रक्रियेनंतर पुन्हा सवलती मिळण्याची पात्रता .. | १३ |


एचके ४६९७ (२,५३४—७-८५)

## महाराष्ट्र शासन

### शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या क्षयरोगविषयक सवलतींच्या संबंधातील नियम
### (~~४ ऑक्टोबर १९६८~~ पर्यंत सुधारण्यात आल्याप्रमाणे)

31-3-1984

**विषय.—क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सवलती देणे.**

वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या शासन निर्णय, स्थानिक (एल. एस. जी) शासन संस्था व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. टीबीसी-१०५३, दिनांक १९ फेब्रुवारी १९५४ (४ ऑक्टोबर १९६८ पर्यंत अद्ययावत करण्यात आलेला) अन्वये मंजूर करण्यात आलेल्या सवलती फुप्फुस क्षयरोग (पल्मोनरी ट्यूबरक्युलॉसिस) व फुप्फुसेतर क्षयरोग (नॉनपल्मोनरी ट्यूबरक्युलॉसिस) झालेल्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यासंबंधातील नियम.

खालील नियम, क्षयरोग (प्लुरसी) तसेच फुप्फुस क्षयरोग तसेच फुप्फुसेतर (नॉनपल्मोनरी) क्षयरोग व कुष्टरोग झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलती विनियमित करतात.

**नियम १.**—महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या व क्षयरोग झाल्याचा संशय असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तपासणीसाठी व अभिप्रायासाठी, ते मुंबई शहरात सेवेत असतील तर जे. जे. गट रुग्णालये किंवा गो. ते. रुग्णालय, मुंबई येथे व ते मुफसल क्षेत्रामध्ये सेवेत असतील तर सर्वांत जवळच्या जिल्हा मुख्यालय रुग्णालयात पाठविण्यात यावे. अशा तपासणीसाठी कोणताही आकार आकारण्यात येऊ नये. जिल्हा शल्यचिकित्सक, त्याला आवश्यक वाटेल तर ते प्रकरण संपूर्ण तपासणीसाठी क्ष-किरण सुविधेसह उचित सुविधा उपलब्ध असलेल्या सर्वांत जवळच्या शासकीय रुग्णालयाकडे पाठवील. क्ष-किरण छायालेख (स्किआग्रॅम) तपासण्यासाठी तसेच प्रयोगशाळेतील तपासण्यांसाठी कोणताही आकार आकारण्यात येणार नाही.

शासन निर्णय, स्थानिक शासन संस्था व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. टीबीजी/१०५८/८, दिनांक ५ मे १९५८. शा.नि., स्था. शासकीय संस्था व सा. आ. विभाग, क्र. टीबीसी., दिनांक १९ फेब्रुवारी १९५४.

**नियम २.**—(अ) बारकाईने विचार केल्यानंतर त्या व्यक्तीला क्षयरोग झाला असल्याचे आढळून आले तर, सर्वसाधारण किंवा विशेष रजा नियमांन्वये किंवा, यथास्थिति, सुधारित रजा नियमांन्वये त्याला देय असलेली सर्व रजा संपेपर्यंत त्या संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने त्याच्याबाबतीत, शिफारस केलेली रजा मंजूर करण्यात यावी. ही रजा संपत आली की, तो परत सेवेत रूजू होण्याची कोणतीही शक्यता आहे किंवा कसे, यासंबंधातील अभिप्राय मिळविण्यासाठी त्याला वैद्यक मंडळापुढे हजर करावे. आणखी उपचार घेतल्यानंतर तो परत सेवेत रुजू होण्यास पात्र ठरेल असा अभिप्राय वैद्यक मंडळाने दिला तर त्याला मंडळाकडून शिफारस करण्यात आलेल्या कालावधीइतकी असाधारण रजा मंजूर करण्यात यावी. मात्र तो कामावर अनुपस्थित राहिल्याचा एकूण अखंड कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक होता कामा नये. वैद्यक मंडळाने, तो परत सेवेमध्ये रुजू होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा अभिप्राय दिला तर त्याला रुग्ण ठरविण्यात यावे.

शा.नि., स्था.शा.सं., व सा.आ.वि., क्र. टीबीसी-१०५९-सी, दि. ४ ऑगस्ट १९६०. शा.नि., स्था.शा.सं. व सा.आ.वि, क्र. टीबीसी-. १०५३, दिनांक १९ फेब्रुवारी १९५४.

शा.नि., स्था.शा.सं. व सा.आ.वि., क्र. टीबीसी-१०५६-एस, दिनांक ५ मे १९५८.

**स्पष्टीकरण.**—वरील नियमांमध्ये करण्यात आलेल्या "देय असलेली सर्व रजा" या शब्द-प्रयोगाचा अर्थ, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला लागू असलेल्या सर्वसाधारण नियमांन्वये "देय व अनुज्ञेय असलेली रजा" असा लावावा.

सहा महिन्यांपेक्षा अधिक रजा देय असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आल्यानंतर सहा महिन्यांनी परंतु देय रजा संपण्यापूर्वी वैद्यक मंडळाने करावयाच्या वर उल्लेखिलेल्या तपासणीची व्यवस्था करावी. एकूण देय रजा सहा महिन्यांपेक्षा कमी असेल, त्या प्रकरणांच्या बाबतीत, वैद्यक मंडळाकडून रुग्णाची तपासणी करण्यात येईपर्यंत तो कालावधी पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या रजेइतकी असाधारण रजा मंजूर करता येईल.

शा.नि., स्था.शा.सं. व सा.आ.वि., क्र. टीबीसी-१०५३, दिनांक १३ ऑगस्ट १९५४.

वैद्यक मंडळे नसतील अशा ठिकाणी जिल्हा शल्यचिकित्सक, महाराष्ट्र शासनाच्या महाशल्यचिकित्सकांच्या मंजुरीने रुग्णावर उपचार करण्यात येत असलेल्या संस्थेच्या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहायाने, क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यासाठी वैद्यक मंडळाला आमंत्रित करेल. नेहमीच्या किंवा विशेष रीत्या आमंत्रित करण्यात आलेल्या वैद्यक मंडळाकडून करण्यात येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय तपासणीचा खर्च, सामान्यत: वैद्यक मंडळाला ज्या ठिकाणी आमंत्रित करण्यात येते त्याच ठिकाणी वैद्यक मंडळाला आमंत्रित करण्यात आले असेल, तर शासनाकडून सोसण्यात यावा. परंतु प्रकृती इत्यादीच्या कारणासाठी शासकीय कर्मचाऱ्याने केलेल्या विनंतीवरून सामान्यत: वैद्यक मंडळाला आमंत्रित करण्यात येत असेल त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी त्या मंडळाला आमंत्रित करण्यात आले असेल तर त्याबाबतीत, म्हणजेच वैद्यक मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या प्रवासभत्यावरील खर्च, इत्यादींसाठी शासनाला करावा लागणारा जादा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्याकडून सोसण्यात येईल.

(ब) क्षयरोगाची बाधा झालेल्या व त्या रोगावरील उपचारांसाठी स्थापन करण्यात आलेल्या मान्यता प्राप्त संस्थेमध्ये उपचार घेत असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांची मग ते राजपत्रित असोत किंवा अराजपत्रित असोत सेवा अखंड रहावी म्हणून आणि त्यांना उपचार करण्यात आल्यानंतर आपल्या मूळ पदांवर परत जाणे शक्य व्हावे म्हणून त्यांना, सरासरी वेतनावरील रजा किंवा यथास्थिति, अर्जित रजा आणि/किंवा अनुज्ञेय असलेली वैद्यकीय प्रमाणपत्रावर मिळणारी रजा यांच्या व्यतिरिक्त मुंबई नागरी सेवा नियम ७८२ किंवा सुधारित रजा नियम, १९३५ चा नियम १४(२) (मुंबई नागरी सेवा नियम नियमपुस्तिका, खंड दोनचे परिशिष्ट चव्वेचाळीस–अ), किंवा मुद्रणालयातील स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांच्या वेतनासंबंधातील सुधारित रजा नियम याचा नियम ६ (२) (मुंबई नागरी सेवा नियम नियमपुस्तिका, खंड दोनचे परिशिष्ट चव्वेचाळीस-ब) हे शिथिल करून खालील शर्तींच्या अधीनतेने कोणत्याही एका वेळी बारा महिन्यांच्या कमाल कालावधीपर्यंत असाधारण रजा मंजूर करता येईल, त्या शर्ती अशा :—

(१) शासकीय कर्मचारी ज्या पदावरून रजेवर जाणार असेल ते पद, तो सेवेत परत रुजू होईपर्यंत टिकण्याचा संभव असेल.

(२) रजेची शिफारस करण्यात आलेला कालावधी विनिर्दिष्ट करून वैद्यक मंडळाकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीनतेने असाधारण रजा मंजूर करण्यात येईल, आणि,

(३) वैद्यक मंडळाने, रजेची शिफारस करताना, मुंबई नागरी सेवा नियम ६५९ च्या तरतूदी व शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. २५२४/३३, दिनांक १६ मे १९४१ अन्वये काढण्यात आलेले आदेश लक्षात घेतले पाहिजेत.

(क) बारा महिन्यापर्यंत असाधारण रजा मिळण्याची सवलत ही, या सवलतीच्या प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त असलेल्या व शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ठिकाणी, किंवा त्या ठिकाणाजवळ असलेल्या संस्थांपैकी कोणत्याही संस्थेमध्ये जागा नसल्यामुळे आपल्या निवासस्थानी उपचार करून घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनाही अनुज्ञेय असेल—

(१) त्याने उचित अर्हताप्राप्त व मान्यताप्राप्त वैद्यक व्यवसायीकडून उपचार करून घेतले पाहिजेत, आणि

(२) त्याने, तो त्या वैद्यक व्यवसायीकडून उपचार करून घेत असून शिफारस करण्यात आलेली रजा संपल्यानंतर तो बरा होण्याचा वाजवी संभव आहे, अशा अर्थाचे त्या वैद्यक व्यवसायीच्या सहीचे प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.

(ड) नियमान्वये अनुज्ञेय असलेल्या असाधारण रजेची कमाल मर्यादा संपण्यापूर्वी, तो शासकीय कर्मचारी सेवेत परत रुजू होण्यास पात्र आहे की त्याला रुग्ण ठरवण्यात यावे, हे ठरविण्यासाठी वैद्यक मंडळाकडून त्याची तपासणी करण्यात यावी. शासकीय कर्मचाऱ्याच्या प्रकृतीमध्ये बरीच सुधारणा झाली असल्याचे आढळून आले, परंतु त्याची प्रकृती पूर्णत: सुधारावी यासाठी व तो सेवेत परत रुजू होण्यास पात्र ठरावा यासाठी अजूनही काही दिवस, समजा १ ते ३ महिने, रजा आवश्यक असल्याचे आढळून आले तर तीन महिन्यांच्या मर्यादेच्या अधीनतेने आणखी रजा मंजूर करता येईल. मात्र असे की, तो कालावधी संपेपर्यंत तो कर्मचारी सेवेत परत रूजू होण्याचा संभव आहे असे प्रमाणित करण्यात आले पाहिजे.

(ई) सर्व विभागप्रमुखांनी किंवा, यथास्थिती, कार्यालय प्रमुखांनी क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याला वैद्यक मंडळाकडे पाठविताना, वैद्यक मंडळाला तो शासकीय कर्मचारी संपूर्ण रजा संपण्यापूर्वी निरोगी होण्याचा संभव आहे किंवा कसे, हे प्रमाणित करणे शक्य व्हावे म्हणून क्षयरोग सवलतीच्या अनुरोधाने संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने अगोदर उपभोगलेल्या असाधारण रजेचा कालावधी व शिल्लक असलेली अनुज्ञेय रजा न चुकता कळविली पाहिजे.

(फ) (१) स्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना क्षयाच्या आजारामुळे मिळालेली असाधारण रजा, ते कामावर अनुपस्थित राहिल्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या तीन वर्षांच्या कालावधीत होणारी अशी असाधारण रजाच मुंबई नागरी सेवा नियम ५०(ब) अन्वये वेतनवाढीसाठी हिशेबात घेण्यात येईल, या शर्थीच्या अधीनतेने वेतनवाढीसाठी हिशेबात घेण्यात यावी.

(२) क्षयरोगविषयक सवलतीच्या नियमांनुसार देय असलेल्या प्रमाणात व सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या आधारावर जर एखाद्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्याने असाधारण रजा उपभोगली असेल तर अशा रजेचा कालावधीसुद्धा वेतनवाढीसाठी हिशोबात धरण्यात यावा. शा.नि., न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी १०६८/३२८५/पी. दि. २९ सप्टेंबर १९७२.

(ग) (१) शासकीय कर्मचाऱ्याला, त्याने घेतलेला पगार लक्षात न घेता त्याला अनुज्ञेय व देय असलेली सरासरी वेतनावरील सर्व रजा संपल्यानंतर सरासरी वेतनावरील क्षयरोग रजा मंजूर करण्यात यावी आणि अशा क्षयरोग रजेसाठी मिळणारे रजावेतन सामान्य नियमांनुसार विनियमित करण्यात यावे. एकूण क्षयरोग रजा एक वर्षापेक्षा अधिक होता कामा नये. ही रजा संपल्यानंतर, तो बरा होण्यासाठी आणखी काही काळ रजा आवश्यक असल्याचे आढळून आले, तर त्याला अर्ध सरासरी वेतनावरील रजा, देय असल्यास, मंजूर करण्यात यावी. अर्धसरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर पुढील सेवेसंबंधातील त्याच्या पात्रतेसाठी त्याची तपासणी करून घेण्याकरिता त्याला वैद्यक मंडळासमोर हजर करण्यात यावे आणि या नियमांनुसार मंजूर करण्यात येणारी सर्व रजा ही तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही, या शर्थीच्या अधीनतेने वैद्यक मंडळाकडून शिफारस करण्यात आलेली असाधारण रजा त्याला मंजूर करण्यात यावी. शा.नि.,स्था. शा. सं. व सा. आ.वि. क्रमांक टीबीसी-१०५८-एस, दि. १ फेब्रु. १९६०. शा.नि.,न.वि. व आ.वि. क्र. टीबीसी-१०६२-एस, दिनांक १२ जुलै १९६२. शा.नि..न.वि. व आ.वि. क्र. टीबीसी-१०५८-एस, दिनांक ३ मे १९६३.

(२) क्षयरोग नियमांच्या नियम २, पोट-नियम (ग) (१) अन्वये मंजूर करण्यात आलेली सरासरी वेतनावरील क्षयरोग रजा ही, शासकीय कर्मचाऱ्याच्या रजा लेख्यापासून खर्ची घालण्यात येऊ नये.

शा.नि.,न.वि. व सा. आ. वि. क्र.टीबीसी-१०६२-एस, दिनांक ३ नोव्हेंबर १९६०. शा.नि.,न.वि. व आ.वि. क्र. टीबीसी-१०६३/५५१६९-एस, दि. ९ एप्रिल १९६४.

(ह) पोट-नियम (ग) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या सरासरी वेतनावरील क्षयरोग रजेची सवलत ही, १ फेब्रुवारी १९६० पासून त्या तारखेस अर्ध सरासरी वेतनावर किंवा असाधारण रजेवर असलेल्या व क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याला, या नियमांन्वये मंजूर करण्यात येणारी सर्व रजा तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही या शर्तीच्या अधीनतेने देण्यात यावी.

शा.नि.,न.वि. व आ. वि., क्र. टीबीसी-१०६१-एस, दि. २३ जाने. १९६२. शा.नि.,स्था. शा. सं. व सा.आ.वि., क्र. टीबीसी-१०५६-एस, दिनांक २६ नोव्हेंबर १९५६. शा. निर्णय क्र. टीबीसी-१२५५-दि. २० जुलै १९५५. शा.नि.,स्था. शा.सं. व सा. आ. वि. क्र. टीबीसी-१०५७-एस, दिनांक ६ ऑक्टोबर १९५७.

**नियम ३.**—(अ) शासकीय कर्मचाऱ्यास तो रजेवर असताना शासकीय वैद्यक संस्थेमध्ये उपचार करून घेण्यास फर्मावण्यात यावे किंवा त्याला अधिक पसंत असेल तर त्याला सक्षम खाजगी वैद्यक व्यवसायीकडून किंवा खाली नमूद करण्यात आलेल्या संस्थांपैकी कोणत्याही मान्यताप्राप्त बिनसरकारी क्षयरोग आरोग्य धामामध्ये किंवा संस्थेमध्ये उपचार करून घेता येतील :—

द बेलएअर सॅनेटोरियम, दालकेश, पाचगणी.

हिल साईड सॅनेटोरियम, वेंगुर्ले.

बानलेस ट्यूबरक्युलॉसिस सॅनेटोरियम, बानलेसवाडी.

द नाशिक ट्यूबरक्युलॉसिस सॅनेटोरियम, म्हसरूळ, नाशिक.

द ग्रुप ऑफ ट्यूबरक्युलॉसिस हॉस्पिटल, शिवडी, मुंबई.

द एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल, सोलापूर.

द तळेगाव जनरल हॉस्पिटल ॲंड ॲकॉन्व्हलसंट होम, तळेगाव (दाभाडे), जिल्हा पुणे.

द शशिकला ट्यूबरक्युलॉसिस सॅनेटोरियम, जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर.

द स्वस्तिक टी. बी. सॅनेटोरियम, वाई, जिल्हा उत्तर सातारा.

द इव्हॅन्जलीन बूथ हॉस्पिटल, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर.

के. ई. एम. हॉस्पिटल, मुंबई.

रुग्णाला रुग्णालयामध्ये किंवा सॅनेटोरियममध्ये राहण्यास सांगण्यात यावे की आवश्यक वाटतील अशा शर्थींच्या अधीनतेने अशा संस्थेबाहेर राहून त्याने उपचार करून घ्यावे, यासंबंधात निर्णय घेण्याचा स्वेच्छाधिकार वैद्यकीय अधिकाऱ्यांना असला पाहिजे.

(ब) (१) शासकीय कर्मचाऱ्याला विद्यमान संस्थांमध्ये (म्हणजेच शासकीय रुग्णालय किंवा मान्यताप्राप्त बिनसरकारी रुग्णालय किंवा सॅनेटोरियम) यांमध्ये दाखल करून घेण्यासाठी शक्य असेल तेथवर खाजगी सुविधा पुरविण्यात याव्यात. मात्र संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा अधीक्षक, जे. जे. गट रुग्णालय किंवा गो. ते. रुग्णालय यांच्या मते तो संस्थेमध्ये राहून उपचार करून घेण्यास पात्र असला पाहिजे. शा.नि., स्था. शा. सं. व सा. आ. वि. क्र. टीबीसी-१०५७-एस., दि. २२ सप्टेंबर १९५९.

२ क्षयरोगावरील उपचारांसाठी उचित सुविधा उपलब्ध असलेल्या शासकीय रुग्णालयांमध्ये किंवा जेथे शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांवरील मोफत उपचारांसाठी राखीव खाटा ठेवल्या असतील अशा खाजगी क्षयरोग आरोग्यधामांपैकी एखाद्या आरोग्यधामामधील राखीव खाटेवर राहण्याची सोय होऊ शकत नसलेल्या आणि बिनसरकारी आरोग्यधामामध्ये किंवा रुग्णालयामध्ये किंवा खाजगी वैद्यक व्यवसायीकडून उपचार करून घेण्यास परवानगी देण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला खालील सवलती मिळण्याचा हक्क असेल :—

(अ) दरमहा ७६० रु. पेक्षा अधिक वेतन नसलेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत, नियम ४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या मर्यादांच्या अधीनतेने, रुग्णालयातील किंवा आरोग्य-धामातील खर्च तसेच विशेष आहार व विशेष औषधे यांवरील खर्च. शा.नि., स्था. शा.सं.न.वि. व सा. आ. वि. क्र.-टीबीसी-१०६५/१२२८४-एस. दि. १९ मे १९६६.

(ब) दरमहा रु. ७६० पेक्षा अधिक वेतन असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत केवळ युनायटेड किंग्डमच्या नॅशनल हेल्थ फॉर्म्युलरीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या औषधां-वरील परंतु नियम ४(३) मध्ये नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला असा खर्च. शा.नि., न.वि. आ. व गृहनिर्माण वि. क्र. टीबीसी-१०६५/१२२८४-एस्. दि. १९ मे १९६६.

(क) खाजगी वैद्यक व्यवसायीकडे उपचार करून घेणाऱ्या किंवा शासकीय रुग्णालयांमध्ये किंवा मान्यताप्राप्त खाजगी संस्थांमध्ये बाह्यरुग्ण म्हणून उपचार करून घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना खालील शर्थींच्या अधीन राहून सवलती द्याव्यात :—

(एक) वैद्यकीय अधिकाऱ्याने म्हणजेच जिल्हा शल्यचिकित्सकाने किंवा शासकीय रुग्णालयाच्या अधीक्षकाने, त्याला आवश्यक वाटतील त्या शर्थींवर त्या शासकीय कर्मचाऱ्याला अशा वैद्यक व्यवसायीकडून उपचार करून घेता येतील, असे प्रमाणित करावे.

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याची तपासणी केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याने शक्यतोवर त्याला शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करून घेण्यात येण्यासाठी प्रयत्न करावा व त्याचवेळी रुग्णाला स्वतः होऊनही त्यापैकी एखाद्या संस्थेमध्ये दाखल होण्याचा प्रयत्न करता यावा म्हणून त्याला मान्यप्राप्त आरोग्यधामांची किंवा संस्थांची यादी द्यावी.

(तीन) रुग्णाने स्वतःसाठी खरेदी केलेल्या विशेष औषधांची आवश्यक प्रमाणके सादर करावीत व वैद्यक व्यवसायी, किंवा, यथास्थिति, संबंधित संस्थांचे प्राधिकारी यांनी ती प्रतिस्वाक्षरित करावीत.

शा.नि., न.वि. व आ. वि., क्र. टीबीसी-१०६०-एस, दिनांक ६ फेब्रुवारी १९६१.

(ड) दरमहा रु. ५० या दराने विशेष आहार भत्ता आणि करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च यांपैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम, विशेष आहार भत्ता म्हणून मंजूर करण्यात यावी. मात्र खाली नमूद केलेले प्रतिज्ञापत्र रुग्णाने दिलेले असले पाहिजे व वैद्यकीय अधिकाऱ्याने ते प्रतिस्वाक्षरित केले असले पाहिजे :—

शा.नि., न.वि. व. आ. वि., क्र. १०६५/१२२८४-एस, दिनांक १९मे१९६६.

मी, याद्वारे असे जाहीर करतो की, मी, श्री. ..............................

डॉ. .............................. यांच्याकडून क्षयाच्या आजारा वर उपचार

करून घेतले आहेत. आणि त्यांच्या सल्ल्यावरून मी, .............................. यासारखा

विशेष आहार घेतलेला असून त्यासाठी मी, .............................. दिनांक

.............. ते .............. या कालावधीसाठी रु. ........ एवढा खर्च केलेला

आहे.

(इ) शासकीय संस्थांमध्ये आंतररुग्ण म्हणून उपचार घेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना, त्यांनी ज्या बाबींवर खर्च केला असेल त्या बाबींसंबंधात, नियम ४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने आर्थिक सवलती देण्यात याव्यात. मात्र त्यांच्या मागणीच्या पुष्टीसाठी त्यांनी आवश्यक प्रमाणके व प्रमाणपत्रे सादर केली पाहिजेत.

शा.नि., स्था.शा.सं.व सा.आ.वि., क्र. टीबीसी-१०५६-एस, दिनांक २२ जुलै १९५७.

**टीप.**—विशेष आहारासाठीची प्रमाणके सादर करण्यासंबंधातील आवश्यकता सोडून देण्यात येईल. मात्र संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने, त्याने दरमहा ५० रु. किंमतीचा विशेष आहार घेतला आहे असे प्रतिज्ञापत्र दिले पाहिजे.

शा.नि., न.वि. स्था.आ. व गृहनिर्माण वि. क्र. टीबीसी-१०६७-२५९६२-एस, दिनांक २४ जुलै १९६७. शा.नि., स्था. शा.सं.सा.आ., वि. क्रमांक टीबीसी-१०५७-एस, दिनांक २२ नोव्हेंबर १९५९.

**नियम ४.**—दरमहा रु. ७६० पेक्षा अधिक वेतन नसलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना प्रदायी रुग्ण म्हणून (शासनाने राखून ठेवलेल्या मोफत खाटांवरील रुग्ण म्हणून नव्हे) खाजगी मान्यताप्राप्त आरोग्यधामांमध्ये किंवा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असेल, त्यावेळी शासन विशेष आहार व विशेष औषधे यांवरील खर्च आणि आरोग्यधामाचा खर्च करण्यासाठी खालील रकमांचा मर्यादेपर्यंत सहाय्य देईल :—

(१) आरोग्यधामाच्या खर्चासाठी दरमहा रु. २५ (यामध्ये सर्वसाधारण निवास व्यवस्था, सर्वसाधारण आहार व सर्वसाधारण औषधे यांवरील खर्चाचा समावेश आहे) आणि रुग्णांनी प्रत्यक्ष केलेल्या खर्चाच्या दराने रक्कम, यांपैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.

(२) आरोग्यधामाच्या वैद्यकीय अधीक्षकाने कोणताही विशेष आहार विहित केला असल्यास किमतीं जास्त असतील त्या कालावधीमध्ये अशा आहाराच्या खर्चासाठी दरमहा रु. ५० एवढा भत्ता.

शा.नि.,न.वि. सा.आ.व गृहनिर्माण वि., क्र. टीबीसी-१०६७–२५९५२–एस, दिनांक २४ जुलै १९६७.
शा.नि.,न.वि. सा.आ. व गृहनिर्माण वि. क्र. -टीबीसी १०६५–१२२८४, दिनांक १९ मे १९६६.

(३) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय भत्ता) परिचर्या नियम, १९६१ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांनी विशेष औषधांवर (अनुज्ञेय नसलेल्या औषधांच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेली औषधे वगळून) केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांनी मान्यताप्राप्त आरोग्यधामांमध्ये किंवा रुग्णालयांमध्ये थुंकीची तपासणी (पी. पी. स्पुटम), रक्त तपासणी करून घेण्यासाठी इंजेक्शने, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती घेण्यासही परवानगी देण्यात यावी. हे आदेश ते निर्गमित केल्याच्या तारखेपासून अंमलात येतील. अन्यथा निर्णय घेण्यात आलेली मागील प्रकरणे परत सुरू करण्याची आवश्यकता नाही.

शा.नि.,न.वि. सा. आ. व गृहनिर्माण विभाग, क्र. एमएजी-१०६४–९८४०–एस, दिनांक ४ जुलै १९६७.

**नियम ५.**—ज्याला क्षयरोग झालेला होता अशा शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्या तपासणीसाठी वैद्यक मंडळाकडे पाठविण्यात यावे व त्याला खालील शर्तींवर त्याच्या कामावर परत रुजू होण्यास परवानगी देण्यात येण्यापूर्वी त्याच्या शारीरिक पात्रतेसंबंधात प्रमाणपत्र मिळविण्यात यावे :—

(अ) तो शासकीय कर्मचारी संबंधित शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या उचित वैद्यकीय देखरेखीखाली राहील व त्याच्याकडून उपचार करून घेईल. अशा वैद्यक व्यवसायीने रोगी व्यक्तीच्या स्वतःच्या हिताच्या दृष्टीने तसेच सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने, त्याची वेळोवेळी नियमित तपासणी व्हावी म्हणून अशा प्रकारणाची एक विशेष नोंदवही ठेवली पाहिजे.

शा.नि.,न.वि. सा. आ. व गृहनिर्माण वि. क्र. टीबीसी–१०६८–५४६६८–पी, दिनांक १९ नोव्हेंबर १९६८.

(ब) ज्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याला क्षयरोगाची बाधा झाल्याची शंका आली असेल असा कर्मचारी किंवा संरोधित क्षयरोगाची लागण झालेला शासकीय कर्मचारी योग्य अशा शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याकडून आणि आवश्यक वाटल्यास शासनाने मान्य केलेल्या एखाद्या सक्षम क्षयरोगतज्ज्ञाकडून ठराविक कालांतराने पुनः पुनः स्वतःची तपासणी करवून घेईल. अशी वेळोवेळी करावी लागणारी तपासणी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने विनामूल्य करावी.

(क) वैद्यकीय मंडळाने संबंधित कर्मचाऱ्यास ज्या दिवशी त्याची वैद्यकीय तपासणी होईल त्याचदिवशी त्याला शारीरिक पात्रतेचे प्रमाणपत्र द्यावे. तरीसुद्धा कदाचित वैद्यकीय मंडळ वैद्यकीय तपासणीच्या दिवशीच शारीरिक पात्रता प्रमाणपत्र देऊ शकले नाही, तर अशा प्रमाणपत्राच्या विलंबाची कारणे त्यांनी संबंधित कर्मचारी, विभागप्रमुख व संचालक, आरोग्य सेवा यांना कळविली पाहिजेत.

शा.नि.,सा.आ वि. क्र. एम–एजी/१०८४/२२४६/पीएच–९ अ, दि. ३१-३-८४

**टीप.**—वैद्यकीय तपासणीचा दिवस व शारीरिक पात्रतेसंबंधीचे प्रमाणपत्र दिल्याचा दिवस या दरम्यानच्या कालावधीमध्ये शासकीय कर्मचारी वैद्यकीय मंडळाकडून शारीरिकदृष्ट्या अपात्र ठरविला गेला असे मानण्यात यावे.

शा.नि.,न.वि. व आ.वि., क्र. टीबीसी–१०७३/८८८३४/पीएच९अ, दिनांक २४ जुलै १९७८.

**नियम ६.**—(अ) वैद्यकीय तपासणीसाठी व औषधोपचारांसाठी शासकीय वैद्यकीय संस्थांमध्ये जाण्यासाठी व तेथून परतण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना प्रवासभत्ता देण्यात येईल. हा प्रवासभत्ता त्यांना त्यांनी प्रत्यक्ष भरलेल्या भाड्यानुसार व अनुज्ञेय दराने मिळेल. या प्रवासभत्त्याच्या रकमेसाठी त्यांचे निवासस्थान हे त्यांचे मुख्यालय म्हणून मानण्यात येईल. अशाच प्रकारचा प्रवासभत्ता जर शासकीय कर्मचारी मान्यताप्राप्त अशासकीय क्षयरोग आरोग्यधाम किंवा संस्थांमध्ये गेले तर मंजूर होईल.

(ब) क्षयरोगाच्या (शासकीय कर्मचाऱ्याच्या) सोबत एखादा परिचर असेल तर त्याला क्षयरोगी ज्या वर्गाने प्रवास करील त्या उचित वर्गाचे किंवा परिचर प्रत्यक्ष ज्या वर्गाने प्रवास करील अशा खालच्या वर्गाचे प्रत्यक्ष एकेरी भाडे मंजूर करण्यात येईल.

**नियम ७.**—एखादा क्षयरोगग्रस्त शासकीय कर्मचारी कामावर रुजू होण्यास पात्र असल्याचे प्रमाणित करण्यात आले असेल त्याबाबतीत विभागाने त्याला शक्य होईल तेथवर आणखी एखाद्या वर्षापर्यंत हलक्या स्वरूपाचे काम द्यावे आणि त्याचप्रमाणे त्याला विश्रांती घेण्यासाठी दररोज किंवा त्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार अधूनमधून काही वेळ दिला पाहिजे.

शा.नि. क्र. टीबीसी–१०३८-एस, दिनांक १ फेब्रु. १९६०.

**नियम ८.**—एक वर्षापेक्षा अधिक अखंडित सेवा झालेले अस्थायी शासकीय कर्मचारी या नियमांनुसार द्रव्यविषयक सवलती व सरासरी वेतनावरील क्षयरोग रजेच्या सवलती यांच्यतिरिक्तच्या इतर सवलती मिळण्यास पात्र असतील. द्रव्यविषयक सवलती व सरासरी वेतनावरील क्षयरोग रजा ही केवळ तीन वर्षे किंवा त्याहून अधिक इतकी अखंडित सेवा झालेल्या स्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असेल. एक वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना या सवलतींपैकी कोणतीही सवलत मिळण्याचा हक्क नाही.

**टीप.**—एक वर्षाची किंवा तीन वर्षांची अखंडित सेवा म्हणजे क्षयरोगावरील उपचारासाठी रजा सुरू होईल त्यावेळेपर्यंत महाराष्ट्र शासनाकडे केलेली विनिर्दिष्ट कालावधी एवढी सेवा होय.

**नियम ९.**—या नियमांन्वये देण्यात आलेल्या द्रव्यविषयक सवलतीमुळे येणारा खर्च, संबंधित विभागाच्या सर्वसाधारण प्रशासनाचा खर्च, भत्ते व मानधन प्राथमिक युनिटाच्या ज्या अर्थसंकल्प शीर्षाखाली टाकण्यात येतो त्याच शीर्षाखाली टाकण्यात यावा.

**नियम १०.**—या नियमांन्वये उपलब्ध असलेल्या सवलती, कोणत्याही परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्तीचे नियत वयमान झाल्यानंतर बंद होतील.

शा.नि.,न.वि. सा.आ. व गृहनिर्माण वि., क्र. एमएजी–१०६३–३९०१२-एस, दिनांक ९ एप्रिल १९६४.

शा.नि.,न.वि. सा.आ. व गृहनिर्माण वि., क्र. टीबीसी–१०६५–१२२८४-एस, दिनांक १९ मे १९६६.

**नियम ११.**—ज्यांना क्षयरोग झालेला होता व जे कामावर परत रुजू होण्यास पात्र असल्याचे जाहीर करण्यात आले आहे अशा शासकीय कर्मचाऱ्यांना खालील द्रव्यविषयक सवलती मंजूर करण्यात येतील :—

(१) जादा आहाराकरिता दरमहा रु. ३० वरील सवलती या शासकीय कर्मचारी सेवेत परत रुजू होईल त्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी उपलब्ध होतील. मात्र जादा आहार, औषधे व शक्तिवर्धके यांची शिफारस जिल्हा शल्यचिकित्सकाकडून किंवा तो शासकीय कर्मचारी उपचार करून घेत असलेल्या रुग्णालयाच्या प्राधिकाऱ्यांकडून करण्यात आली असली पाहिजे. तसेच त्याच्या मागण्यांच्या पुष्टीसाठी त्याने आवश्यक प्रमाणके सादर केली पाहिजेत.

**टीप.**—हा नियम १४ डिसेंबर १९५५ पासून अंमलात येईल. भूतलक्षी प्रभावाने अंमलात येणार नाही.

(२) विभागप्रमुखांनी सवलती मंजूर करताना, जिल्हा शल्यचिकित्सकाचे अथवा ज्या रुग्णालयात सदर कर्मचाऱ्याने उपचार करून घेतले असतील त्या रुग्णालयाच्या प्राधिकाऱ्याचे जादा आहार औषधे आणि शक्तिवर्धके इत्यादींची शिफारस करणारे प्रमाणपत्र सादर करण्यास त्या कर्मचाऱ्याला भाग पाडले पाहिजे. औषधे आणि शक्तिवर्धके इत्यादींबाबतची प्रमाणके सादर केल्यावर संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने दिलेले "आपण दरमहा रु. १५ किंमतीचा जादा आहार घेतला आहे" असे प्रतिज्ञापन पुरेसे असेल.

शा.नि.,स्था. शा.सं. व सा. आ. वि., क्र. टीबीसी–१०५६–एस, दिनांक ५ सप्टेंबर १९५६.

**नियम १२.**—सवलतींची गरज असलेला शासकीय कर्मचारी ज्या विभागाच्या सेवेत असेल त्या विभागाचा प्रादेशिक अधिकारी किंवा जेथे प्रादेशिक अधिकारी नसेल त्या ठिकाणी विभागप्रमुख हा या सवलती मंजूर करणारा प्राधिकारी असला पाहिजे.

**नियम १३.**—ज्यांना क्षयरोग झालेला होता व जे रजा संपल्यानंतर कामावर रुजू होण्यास पात्र असल्याचे ठरविण्यात आले आहे. अशा शासकीय कर्मचाऱ्यांनी क्ष-किरण साधने उपलब्ध असतील अशा अगदी नजिकच्या एखाद्या जिल्हा रुग्णालयातून किंवा जेथे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी मोफत राखीव खाटा असतात अशा मान्यताप्राप्त आरोग्यधामांतून ठराविक कालांतराने आपली तपासणी करून घेतली पाहिजे. रुग्णांस तपासणाऱ्या विशेषज्ञाच्या मते त्या रुग्णांच्या बाबतीत अशी तपासणी आवश्यक वाटत असेल तोपर्यंत अशी ठराविक कालानंतरची तपासणी केली पाहिजे. त्यापलीकडे अनिश्चित काळपर्यंत ती केली जाऊ नये. अशा शासकीय कर्मचाऱ्यांचा प्रवासभत्त्यावरील खर्च शासनाने सोसला पाहिजे.

शा.नि.,स्था. शा.सं. व सा. आ. वि., क्र. टीबीसी–१०५९-एस, दिनांक २९ एप्रिल १९५९.

**नियम १४.**—(१) क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या सवलतींचा लाभ त्या कर्मचाऱ्यांनी एकदा घेऊन झाल्यानंतर आणि उपचारानंतर ते कामावर रुजू होण्यास पात्र असल्याचे प्रमाणित करण्यात आल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा क्षयरोगाचा संसर्ग झाला तर त्या सवलती पुन्हा दिल्या जाऊ शकतील.

(२) क्षयरोगविषयक सवलतीची गरज असलेला एखादा शासकीय कर्मचारी ज्या विभाग-प्रमुखाच्या हाताखाली काम करत असेल तो अधिकारी अशा सवलती मंजूर करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी असेल. त्यामुळे नियम ३ (तीन) अन्वये सादर करणे आवश्यक असलेली प्रमाणके ही विभागप्रमुखाकडे सादर करावीत. म्हणजे तो या सवलती प्राधिकृत करू शकेल. कोषागाराकडे पाठविण्यात येणाऱ्या देयकांबरोबर ही प्रमाणके जोडण्याची आवश्यकता नाही.

शा.नि.,स्था. शा. सं. व सा. आ. वि., क्र. टीबीसी–१०५३, दिनांक ३१ मे १९५४.

**टीप.**—(१) सामान्यपणे शासकीय कर्मचाऱ्यास क्षयरोगविषयक सवलती दोन वेळा मंजूर करण्यात याव्यात. तिसऱ्या वेळी रजा मंजूर करताना प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने असे प्रमाणपत्र दिले पाहिजे की शासकीय कर्मचाऱ्यांना नियम ५ मधील तरतुदींचे पूर्ण-पालन केले आहे व अजूनही त्यांना तिसऱ्यावेळी रजा मंजूर करण्याची गरज आहे अशी प्रकरणे शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावीत.

(२) शासकीय कर्मचाऱ्यास चौथ्यावेळी क्षयरोगविषयक सवलती मंजूर करू नयेत. चौथ्या वेळी सवलती मागणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास रुग्ण ठरविण्यासाठी वैद्यकीय मंडळापुढे हजर करावे.

शा.नि.क्र. टीबीसी–१०७२/८२७५७/एस, दिनांक १५ डिसेंबर १९७३.

शा.नि.,स्था. शा. सं. व सा. आ. वि., क्र. टीबीसी–१०५७–एस, दिनांक १८ जुलै १९५७ व क्र. टीबीसी–१०५८–एस, दिनांक ५ मे १९५८.

(३) वरील परिच्छेद १ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या सवलती क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना ते निलंबनाधीन असताना देखील उपलब्ध होतील. सामान्य फुफ्फुसावरणदाह (प्लूरसी) झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्या उपलब्ध असणार नाहीत.

शा.नि.,न.वि. सा.आ.व. गृहनिर्माण वि. क्र. एमएजी–१०५८–५१४३८–पी, दिनांक २३ डिसेंबर १९६८.

(४) ज्या शासकीय कर्मचाऱ्यांची सतत तीन वर्षांपेक्षा कमी नाही एवढी सेवा झालेली असेल आणि ज्यांना कुष्ठरोग/कर्करोग (कॅन्सर) अथवा पक्षाघात झालेला असेल त्यांना, शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या क्षयरोगविषयक सवलतींच्या संबंधातील नियमांच्या नियम २, पोट-नियम (ग) अन्वये अनुज्ञेय असलेल्या सरासरी वेतनावर क्षयरोगाच्या रजेसंबंधातील सवलती आणि उक्त नियमांच्या नियम ३ चा पोट-नियम (चार) व नियम ४ चे पोट-नियम (एक) आणि (दोन) तसेच नियम २ चा पोट-नियम (एक) अन्वये अनुज्ञेय असलेल्या द्रव्यविषयक सवलती मंजूर करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे त्यांना दरमहा रु. ५० या दराने विशेष आहार-भत्ता आणि त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची रक्कम, यांपैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम विशेष आहारभत्ता म्हणून देण्यात येईल. शासन निर्णय, नगरविकास व आरोग्य विभाग, क्रमांक टीबीसी-१०६५/६८८३८२-एस, दिनांक १७ फेब्रुवारी १९६८ अन्वये काढलेल्या आदेशांनुसार त्यांना रजेवर रहावे लागणार नाही. विशेष आहारभत्ता एक वर्ष आणि प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी शिफारस करील इतका कालावधी, यापैकी जो कालावधी अगोदर संपत असेल त्या कालावधीपर्यंत देण्यात येईल. तसेच त्यांना सरकारी वैद्यक संस्थांमध्ये वैद्यकीय तपासणीसाठी व उपचारासाठी जाण्या-येण्याच्या संबंधातील प्रवासखर्चही या क्षयरोगविषयक सवलतींच्या संबंधातील नियमांच्या नियम ६(अ) व (ब) च्या तरतुदीनुसार देण्यात येईल.

शा. नि., स्था. व शा. सं. वि. क्र. एमआय-एस-१०५६, दिनांक २२ ऑगस्ट १९५६.

(५) (एक) पूर्वीचे क्षयरोगी रुग्ण म्हणजेच जे पूर्वी शासकीय सेवेत होते परंतु त्यांना क्षयरोग झाल्यामुळे सेवामुक्त करण्यात आले होते, असे कर्मचारी पुन्हा सेवेत नियुक्त केले जाण्यास पात्र असतील, परंतु क्षयरोग विशेषज्ञाने किंवा शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या एखाद्या वैद्यकीय अधिकाऱ्याने ते कर्मचारी शासकीय सेवेसाठी वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याचे आणि रोगसंक्रामक नसल्याचे घोषित केलेले असले पाहिजे.

शा. नि., स्था. शा. सं. व सा. आ. वि., क्र. टीबीसी–१०५६-एस, दिनांक १९ डिसेंबर १९५७.

**टीप.**—वैद्यकीय मंडळ हे पूर्वीच्या क्षयरोग्यांना, ते रोगसंक्रामक नसल्याचे व शासकीय सेवेसाठी वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याचे घोषित करणारे प्राधिकरण असावे. जिल्हा रुग्णालयांचे प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, मुंबईतील वैद्यकीय संस्थांचे अधीक्षक आणि शासकीय क्षयरोग आरोग्यधामांचे अधीक्षक, तसेच उरोरोग रुग्णालय, औंध कँप, पुणे या रुग्णालयाचे अधीक्षक, यांना पूर्वीच्या क्षयरोगी कर्मचाऱ्यांची तपासणी करून घेऊन त्यांना स्वास्थ्य प्रमाणपत्रे देण्यासाठी वैद्यक मंडळाला आमंत्रित करण्याचा प्राधिकार देण्यात आला आहे.

(दोन) त्यांनी पूर्वी जी पदे धारण केलेली असतील त्या प्रवर्गातील काही पदे रिक्त असतील तर त्या पदांवर किंवा त्यांच्या स्वतःच्या विभागातील तत्सम पदांवर पुन्हा नियुक्त केले जाण्यास ते पात्र असतील. त्यांच्याबाबतीत नेहमीची वयाची अट लागू असणार नाही.

(तीन) यथोचित पदे रिक्त होतील तेव्हा सेवायोजन कार्यालयाकडून हस्तक्षेप न केला जाता, संबंधित विभागाकडून पुन्हा नेमणूक केली जाण्यास ते पात्र असतील.

(चार) रिक्त पदे उपलब्ध नसल्यामुळे संबंधित विभागामध्ये त्यांची पुन्हा नियुक्ती होऊ शकत नसेल, तर सेवायोजन कार्यालय नोकरी मिळवण्यात त्यांना मदत करील. या प्रयोजनासाठी तसेच वयोमर्यादा शिथिल करण्याच्या प्रयोजनासाठी त्यांना बदली झालेले शासकीय कर्मचारी समजण्यात येईल.

(पाच) त्यांना ज्या पदावरून सेवामुक्त करण्यात आले असेल त्याच पदावर पुन्हा सेवेत घेण्यात आले तर, त्यांची पूर्वीची प्रत्यक्ष सेवा निवृत्तिवेतनाच्या व ज्येष्ठतेच्या प्रयोजनासाठी अर्हकारी सेवा समजण्यात यावी आणि वेतनाच्या प्रयोजनासाठी सेवामुक्त होण्याच्या वेळी ज्या टप्प्यावरील वेतन त्यांना मिळत होते त्याच टप्प्यावर त्यांचे वेतन निश्चित करावे. त्यांना सेवामुक्त करण्यात आले ती तारीख आणि त्यांना सेवेत पुन्हा घेण्यात आले ती तारीख या दोहोंच्या दरम्यानचा सेवेत पडलेला खंड अखंडित समजण्यात येईल. इतर पदांवर पुन्हा सेवेत घेण्यात आलेल्या अशा कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करून निश्चित करण्यात येईल आणि त्यांचे वेतन वित्त विभागाशी विचारविनिमय करून निश्चित करण्यात येईल.

(सहा) प्रथम नेमणुकीच्या वेळेस त्यांची वैद्यकीय तपासणी झालेली असेल तर त्यांना अशा तऱ्हेने पुन्हा सेवेत घेतेवेळी त्यांची पुन्हा वैद्यकीय तपासणी करण्याची आवश्यकता असणार नाही. तथापि, त्यांना कायम करण्यापूर्वी जर अन्यथा आवश्यक असेल तर नेहमीप्रमाणे त्यांची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल.

(सात) ज्या पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करूनच सेवेत थेट नियुक्ती करण्यात येते अशा पदांवर त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल अशा प्रकरणी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करण्यात यावा. या प्रयोजनासाठी अशा कर्मचाऱ्यांचा सर्व उपलब्ध अभिलेख आयोगाकडे पाठवण्यात येईल. आयोगालाही आवश्यक वाटल्यास आयोगाकडून त्यांची मुलाखतही घेतली जाईल. आणि आयोगाने त्यांना प्रस्तुत पदाच्या नेमणुकीसाठी ते योग्य असल्याचे प्रमाणित केल्यानंतरच त्यांची प्रत्यक्ष नेमणूक करण्यात येईल.

(६) एखादा क्षयरोगी शासकीय कर्मचारी, त्याला क्षयरोगाची बाधा झालेली आहे या कारणावरून पुढील सेवेस असमर्थ ठरवण्यात आल्यामुळे रुग्णता वेतनावर निवृत्त झाला व त्या कर्मचाऱ्यास क्षयरोग बरा झाल्यावर सेवेत पुन्हा घेण्यात आले तर, पुढीलप्रमाणे त्याला सवलती मिळतील :—

(एक) त्याला पुन्हा सेवेत घेतल्यानंतर त्याचे वेतन मुंबई नागरी सेवा, नियम ३२९ अन्वये विनियमित केले जाईल,

(दोन) त्याला, मुंबई नागरी सेवा, नियम १४ (अ) अन्वये पुन्हा वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागणार नाही, आणि

(तीन) त्याच्या नावे शिल्लक असलेली रजा, मुंबई नागरी सेवा, नियम ६१८ (अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पुढे हिशेबात धरली जाईल.

(७) जे शासकीय कर्मचारी पूर्वी सेवेत होते, परंतु त्यांच्याबाबतीत त्यांना सामान्य फुफ्फुसावरणदाहहून (प्लूरसी) वेगळचा अशा क्षयरोगमूलक फुफ्फुसावरणदाहाची बाधा झाल्याच्या कारणावरून सेवामुक्त करण्यात आले असेल अशा कर्मचाऱ्यांना वरील परिच्छेद ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या सवलती लागू होतात. या सवलती जे शासकीय कर्मचारी पूर्वी सेवेत होते, परंतु त्यानंतर त्यांना कुष्ठरोगाची बाधा झाल्यामुळे सेवामुक्त करण्यात आले अशा कर्मचाऱ्यांनाही योग्य त्या फेरफारांसह लागू होतात.

शा. नि., रा. व. से. वि. क्र. एमआयएस-१०५८, दिनांक ८ मे १९५८.]

शा. नि., रा. व. व से. वि. क्र. एमआयएस-१०५६, दिनांक ८ मे १९५८ व क्र. एमआयएस-१०६१-डी, दिनांक १४ मार्च १९६१.

(८) पुन्हा सेवेत घेण्यात येण्याच्या या सवलतीचा लाभ ज्यांना क्षयरोगमूलक प्लूरसीची/कुष्ठ-रोगाची बाधा झाल्यामुळे सेवेतून मुक्त करण्यात आले असेल अशा भूतपूर्व मध्य प्रदेश व हैद्राबाद राज्य शासनांच्या माजी कर्मचाऱ्यांनाही अनुज्ञेय आहे. मात्र, त्यांना १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वीच्या एक वर्षाच्या कालावधीत सेवेतून मुक्त करण्यात आलेले असले पाहिजे व आणखी असे की, मुंबई राज्यात किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र राज्यात समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात त्यांचा अधिवास असला पाहिजे. तथापि, पुन्हा नियुक्त करण्यात आल्यानंतर या व्यक्तींना सर्व प्रयोजनांसाठी म्हणजेच वेतन, रजा, निवृत्तिवेतन व उपदान यांसाठी नवीन सेवाप्रविष्ट कर्मचारी मानण्यात यावे.

शा. नि., रा. व से. वि. क्र. एमआयएस-१०६१-डी, दिनांक १४ मार्च १९६१.

(९) कुष्ठरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचा संबंध असेल तेथवर वरील परिच्छेद ५ व ६ मधील आदेश हे, जे कर्मचारी १ मे १९६० पूर्वी सध्याच्या महाराष्ट्र राज्याचा एक भाग झालेल्या क्षेत्रांमध्ये भूतपूर्व मुंबई राज्य शासनाच्या सेवेत होते व ज्यांना त्या तारखेपूर्वी सेवेतून मुक्त करण्यात आले होते अशा कर्मचाऱ्यांनाही लागू होतात.

शा.नि., न.वि. सा.आ. व गृहनिर्माण वि. क्र. बीसी—टी. १०६८/१९८१९-एस, दिनांक ४ ऑक्टोबर १९६८.

**नियम १५.**—क्षयरोग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना, वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या शासन निर्णय, नागरी स्वराज्यसंस्था व सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक टीसी-१०५३, दिनांक १९ फेब्रुवारी १९५४ अन्वये देण्यात येणाऱ्या सवलती, ३ पेक्षा कमी हयात मुले असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे कुटुंब ३ हयात मुले असलेल्या कुटुंबाइतके मर्यादित ठेवले नाही तर किंवा ३ पेक्षा अधिक हयात मुले असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे कुटुंब तेवढेच मर्यादित ठेवले नाही तर, त्यांना उपलब्ध होऊ शकणार नाहीत.

शा. पूरकपत्र न.वि.सा.आ. व गृहनिर्माण वि. क्र. टीबी सी-१०६८/४३८५६-पी, दिनांक ४ ऑक्टोबर १९६८.

**टीप.**—हा नियम १५ ऑगस्ट १९६८ पासून अंमलात येईल. कार्यालय प्रमुखाने संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला या सवलती मंजूर करताना खालील प्रमाणपत्र सादर करावे :—

**प्रमाणपत्र**

विभागाचे नांव :

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ........................................ यांनी त्याचे/तिचे कुटुंब तीन हयात मुले असलेल्या कुटुंबाइतके मर्यादित ठेवले आहे. त्याच्या/तिच्या कुटुंबात १५ ऑगस्ट १९६८ रोजी .................... मुले आहेत. तो/ती शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या क्षयरोगविषयक सवलतींच्या संबंधातील नियमांनुसार अनुज्ञेय असलेल्या सवलती मिळण्यास पात्र आहे.

कार्यालय प्रमुख.

कार्यालयाची मुद्रा.

**नियम १६.**—नियम १५ मधील आदेशांचे उल्लंघन केल्यामुळे जो शासकीय कर्मचारी या सवलती मिळण्यास अपात्र ठरला असेल अशा शासकीय कर्मचाऱ्याने अथवा पती/पत्नी यापैकी कुणीतरी कुटुंबनियोजन विषयक शस्त्रक्रिया करून घेतली व ज्या रुग्णालयात अथवा औषधालयात शस्त्रक्रिया करून घेतली त्या सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केले असता असा शासकीय कर्मचारी या सवलती मिळण्यात पुन्हा पात्र ठरतो. कार्यालय प्रमुख्याने संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास या सवलती मंजूर करतांना खालील प्रमाणपत्र सादर करावे :—

शा.नि., न. वि. व सा. आ. वि. क्रमांक १०७६/ ३२७५/पी-एच-९, दिनांक २२ सप्टेंबर १९७६.

**प्रमाणपत्र**

विभागाचे नाव :

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ........................ यांनी नियम १५ मधील आदेशांचे उल्लंघन केल्यानंतर असे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले आहे की, त्याने/तिने/त्यांच्या पत्नीने/तिच्या पतीने नियम १६ मधील तरतुदीनुसार कुटुंबनियोजन विषयक शस्त्रक्रिया करून घेतली आहे. तो/ती शासकीय कर्मचाऱ्यासाठी असलेल्या क्षयरोगविषयक सवलतीच्या नियमाखाली देय असलेल्या सवलती मिळण्यास पात्र आहे.

कार्यालय प्रमुख.

कार्यालयाची मुद्रा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई